जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -५५६ दिनांक -१६/०७/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

**हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील काम करणा-या कर्मचारी यांची सायकल कोणीतरी अज्ञात इसमांनी ऑईल पेन्टच्या सहाय्याने पेटवुन सायकलचे सिटचे व टायरचे नुकसान केले बाबत.**

हडपसर पोलीस स्टेशन हद्दीत राहणारे इसम नामे सुनिल महादेव पाटील वय ३० वर्षे, रुम नं. ३०१, तिसरा मजला सी विंग, श्रेयस विहार,पुरंदर कॉलनी, भेकराईनगर पुणे. यांनी पोलीस स्टेशन येथे समक्ष येवुन कळविले की, मा.आमदार श्री.रोहित पवार यांचे जनसंपर्क कार्यालय, सृजन निवास, चिनार बेकरीजवळ, मगरपट्टा सिटी हडपसर पुणे येथे ते कामास असून त्याठिकाणी ते त्यांच्या भावाच्या नावावर असलेली कि.रु. २०००/- ची हिरो कंपनीची हिरव्या रंगाची सायकल हि सुनिल पाटील तसेच त्याठिकाणी कामास असलेला रामबहादुर बि के हे दोघेजण त्यांच्या वैयक्तीक कामासाठी वापर करित असतात. त्यांचे कामे झाल्यानंतर ते सायकल जनसंपर्क कार्यालयाच्या बिल्डींगच्या खाली पार्क करित असतात. दि. १५/०७/२०२३ रोजी रात्रीच्या वेळेस सायकल पार्क करुन ते घरी गेले. व दुस-या दिवशी सकाळी येवुन पाहिले असता त्यांना त्यांची सायकल हि जळालेल्या अवस्थेत दिसली..

सदरची सायकल हि मा.आमदार श्री.रोहित पवार यांचे मालकीची व त्यांचे वापरातील नसून सदरची सायकल हि त्यांचेकडे काम करणारा इसम नामे सुनिल महादेव पाटील यांचे भावाच्या मालकिची आहे. सदर घटनेमध्ये जनसंपर्क कार्यालयाचे अथवा कार्यालायाच्या बाहेर कोणतेही नुकसान झालेले नाही. इसम नामे सुनिल महादेव पाटील यांनी त्यांची सायकल कोणीतरी अज्ञात इसमांनी ऑईल पेन्टच्या सहाय्याने सायकल पेटवुन सायकलचे सिटचे व टायरचे नुकसान केलेबाबत तक्रार दिलेली असून त्यावरुन हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर- १०४४/२०२३ भा.द.वि.कलम- ४३५,४४७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आरोपी शोध घेण्याचे काम चालू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सुवर्णा गोसावी हे करित आहेत